पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ब क्षेत्रिय कार्यालय प्रशासन विभाग
क्र.बक्षेका/१/कावि/७६६/२०२१
दिनांक २८/०७/२०२१

विषय- वर्ग ३ व ४ गणवेश देय कर्मचा-यांनी गणवेश परिधान करणेबाबत...

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कार्यरत असलेले सर्व विभागातील काम करणा-या वर्ग ३ व ४ कर्मचारी यांना गणवेश देय कर्मचा-यांना महानगरपालिकेकडून गणवेश रोख रक्कम तसेच धुलाई भत्ता देणेत येत आहे. मा. आयुक्त यांचेकडील गणवेश देय कर्मचा-यांनी कार्यालयीन वेळत गणवेश परिधान करणेबाबत वेळोवेळी निर्गत केलेले परिपत्रक सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास देणेत येतात. तथापि माझे असे निदर्शनास आले की अनेक वेळा सुचना देऊनही वर्ग ३ व ४ चे गणवेश देय कर्मचारी कार्यालीयन वेळेत महापालिकेने विहित केलेला गणवेश परिधान करित नाहीत. सदरची बाब ही कार्यालयीन शिस्तीस अनुसरुन नसून त्याचा परिणाम कार्यालयाचे प्रतिमेवर होत असतो. मा. आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र. प्रशासन/तप/कावि/११३/२००९ दि. १८/०२/२००९ अन्वये जे कर्मचारी गणवेश देय महापालिकेच्या विहित गणवेश परिधान न केलेस आढळून आल्यास त्यांना सदर दिवशी त्यांच्या शाखाप्रमुख यांनी र.रु २०/- (अक्षरी- र.रु. विस फक्त) दंड आकारणे बाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच ज्या महिन्यामध्ये महानगरपालिकेने विहित केलेला गणवेश कार्यालयीन वेळेत परिधान केला नसलेस सदर महिन्यामध्ये मासिक बिलामधून धुलाई भत्ता कपात करणे अनिवार्य आहे.

सबब मी क्षेत्रिय अधिकारी ब क्षेत्रिय कार्यालय या परिपत्रकान्वये वर्ग ३ व ४ चे गणवेश देय कर्मचा-यांना कळविणेत येत की, महापालिकेने विहित केलेला गणवेश नियमित कार्यालीयन वेळेत परिधान करावा. तसेच ब क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत सर्व शाखा प्रमुखांना सुचित करणेत येते की, वर्ग ३ न ४ चे गणवेश देय कर्मचारी महानगरपालिकेच्या विहित गणवेश परिधान करित नसल्याचे निदर्शनास आल्यास उक्त प्रशासन विभागाकडील परिपत्रकानुसार त्यांना सदर दिवशी र.रु.२०/- (अक्षरी. र.रु विस फक्त) दंड करणेत यावा. वारंवार सुचना देऊनही कार्यालयीन शिस्तीचा भंग होत असल्यास संबधित कर्मचा-याला संबधित शाखाप्रमुख यांनी कडक कारवाई प्रस्तावित करणेत यावी.

(सोनम देशमुख)
क्षेत्रिय अधिकारी
ब क्षेत्रिय कार्यालय
चिंचवड-३३

प्रती-संबधित शाखाप्रमुख, ब क्षेत्रिय कार्यालय

२/ सदरचे परिपत्रक सर्व संबधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन त्यांची स्वाक्षरी घेणेत यावी. त्याची प्रत या कार्यालयास पाठविणेत यावी.

प्रत- प्रशासन विभाग, पिं.चि.मनपा, पिंपरी-१८